तक्रार युएलपी क्र.२१/२०२४
निशाणी क्रं. यू—८

**विपतर्फे ॲड. श्री.डी.एस. देसाई यांचेमार्फत तक्रारदारा यांचा उलटतपास शपथेवर सुरु**

मी विप दुध संघात असिस्टंट मार्केटींग ऑफिसर म्हणून नोकरीस लागलो. दिनांक ०६/०७/२०२२ रोजी माझी बदली पशूखाद्य विभाग पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल येथे झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी मार्केटींग विभागाचा प्रमुख म्हणून काम करीत होतो. माझे वरीष्ठ अधिकारी व्ही.डी.पाटील हे होते. मार्केटींग विभागात माझे वरीष्ठ अधिकारी नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मार्केटींग विभागात माझे अधिपत्याखाली आणि नियंत्रणाखाली काम चालत होते. माझे विभागत सहकारी दुध संस्थांना पशूखाद्य पुरवणे, ट्रक लोड तयार करणे, संस्थेला पशूखाद्य वेळेत पोहोच होते किंवा कसे याची पाहणी करणे इ. कामे मी करत होतो. संबंधीत संस्थेचे सचिव फोन व्दारे पशूखाद्याची मागणी मार्केटींग विभागाकडे करत होते. हे म्हणणे खरे आहे की, पशूखाद्याच्या मागणीची पुर्तता मी करत होतो. पशूखाद्य वाहतूकीसाठी विप संघा तर्फे वाहतूक ठेकेदार नेमले होते. वाहतूक ठेकेदार निवीदेव्दारे नेमले जात होते. संचालक मंडळ वाहतूकीचे टप्पे पाहून कमी दरातील निवीदा मंजूर करत होते. निवीदा मंजूर झाल्यानंतर वाहतूक ठेकेदारासोबत करार होत होता. सदर करारामध्ये वाहतूकीचा दर, टप्पे नमूद असत. ठेकेदार या सहकारी संस्था असायच्या. हे म्हणणे खरे आहे की, पशूखाद्याची वाहतूक झाल्यास त्याची नोंद मार्केटींग विभागाकडे संगणकाव्दारे असायची. वाहतूक संस्थेचे वाहतूकीचे बील दर १५ दिवसांनी अशी महिन्यातून दोन वेळा मागणी प्रमाणे अदा केली जायची. वाहतूकीचे बील संबंधीत ठेकेदाराकडून मार्केटींग विभागाचे क्लार्क श्री. शुभम भोसले यांच्याकडे जमा केले जात होते. स्वत: शुभम भोसले वाहतूकीचे बील, किलोमीटरचे टप्पे आणि दर तपासत होते. हे म्हणणे खरे आहे की,

शुभम भोसलेने तयार केलेली समरी माझेकडे मंजूरीसाठी यायची. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीष्ठ म्हणून समरी मधील नोंदीची तपासणी आणि खात्री करून सही करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसलेने तयार केलेली समरी तपासून खात्री करून वरीष्ठ म्हणून मी ती संबंधीत विभागाकडे पाठवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडील तपासणी आणि खात्री केलेली समरी अकौंट विभागाचे क्लर्क निलेश भोसले यांच्याकडे जात होती.

**विपच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

**सही/—**

कोल्हापूर.
दिनांकः—२५/०२/२०२६

( के. बी. कामगौडा )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.

**तक्रार युएलपी क्र.२१/२०२४**
**निशाणी क्रं. यू—८**

**विपतर्फे ॲड. श्री.डी.एस. देसाई यांचेमार्फत तक्रारदार यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरु**

वाहतूक संस्थेची आलेली दर १५ दिवसांची बीले मार्केटींग विभागाकडे आल्यानंतर शुभम भोसले त्याची तपासणी करत होते. शुभम भोसले हे सदरची बीले वाहतूकीचे टप्पे आणि किलोमीटर प्रमाणे तपासणी करत होते. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या ट्रक मालकाने वाढिव टप्प्याप्रमाणे बीलाची मागणी केल्यास मंजूरीसाठी माझेकडे पाठवले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे बील माझेकडून निलेश भोसले यांचेकडे आणि तेथून अकौंट विभागाकडे जात होते. हे म्हणणे खरे आहे की, निलेश भोसले हे पुन्हा एकदा किलोमीटर आणि टप्प्याची खात्री करून माझे

मंजूरीप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी अकौंट विभागाकडे पाठवत होते. हे म्हणणे खरे आहे की, बीलाची अंतीम समरी करण्यासाठी शुभम भोसलेकडे जात होते. हे म्हणणे खरे आहे की, अंतीम बीलाची समरी माझेकडे आल्यानंतर त्याची खात्री आणि तपासणी करून मी अकौंट विभागाकडे पाठवत होतो.

**प्रश्नः—** एखाद्या संस्थेच्या बीलामध्ये खाडाखोड असल्यास काय प्रक्रीया तुम्ही अवलंबली?

**उत्तरः—** माझेकडे खाडाखोड झालेली बीले आली नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की, निलेश भोसले, शुभम भोसले आणि मार्केटींग विभागातील इतर कर्मचारी यांच्यावर माझे नियंत्रण होते. हे म्हणणे खरे आहे की, टप्पा, किलोमीटर आणि त्याचे दर याचा प्रोग्राम कंप्यूटर प्रोग्रामर करायचा. हे म्हणणे खरे आहे की, कंप्यूटर प्रोग्रामर म्हणून आर.बी.पाटील काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, टेंडर मंजूर झाल्यानंतर प्रोग्राम तयार करून झाल्यानंतर आर.बी.पाटील यांच्या कामाचा काही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रोग्राम झाल्यानंतर आलेली बीले टेंडर प्रमाणे आहेत की नाही याची खात्री आणि तपासणी आमच्या विभागामार्फत केली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रोग्राममध्ये नसलेला टप्पा मी खात्री करून शुभम भोसलेकडे पाठवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही मंजूरी बीलावर आर.बी. पाटील यांची सही अथवा शेरा नसतो. हे म्हणणे खरे आहे की, आर.बी. पाटील यांचा प्रोग्रामनंतर बीलाच्या मंजूरीशी आणि तपासणीशी काहिही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, १ ते १५ दिवसांचे बील वाहतूक संस्थेकडून आल्यानंतर माझे मंजूरीशिवाय पुढील कार्यवाहीसाठी जात नव्हते.

फेब्रुवारी २०२४ मध्ये बीलामध्ये अफरातफर झाल्याचे प्रथम आमच्या विभागास निदर्शनास आले. निदर्शनास आल्यानंतर वाहतूक संस्थेकडे असणारे मुळ बील मॅनेजरकडून मागवून त्याची अकौंट विभागाकडून प्राथमिक तपासणी केली. हे म्हणणे खरे आहे की, तपासणी केल्यानंतर वाहतूक संस्थेकडील मुळ बील आणि माझेकडे सादर केलेले वाहतूक बील याच्यामध्ये तफावत आढळून आली. हे म्हणणे खरे नाही की, तफावत आढळून आलेली बीले माझे मंजूरीने पुढील कार्यवाहीसाठी

पाठवण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, खाडाखोड आणि तफावत असलेली बीले मंजूर होवून संबंधीतास रक्कम रू. ३६,००,०००/— अदा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा कालावधी हा ०१/०४/२०२३ ते ३१/०१/२०२४ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, फेब्रुवारी २०२४ या महिन्यातील १ ते १५ या कालावधीतील बील माझेकडे आल्यानंतर त्यामधील तफावत अकौंट आणि मार्केटींग विभागास लक्षात आल्यानंतर रोखून धरण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाची बातमी स्थानीक वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली होती. स्थानीक वर्तमानपत्रातून आलेल्या बातमीनंतर विप संस्थेच्या लौकीक आणि विश्वासार्हतेबाबत चर्चा झाली होती याबाबत मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, अफरातफर आणि संबंधीत आर्थिक घोटाळा करण्यात माझा गंभीर निष्काळजीपणा कारणीभूत ठरला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर अफरातफरमध्ये विप संस्थेच्या एखाद्या संचालकाचा हात असण्याची शक्यता नाकरता येत नाही याबाबत माझेकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाहतूक संस्थेच्या संचालकाचा आणि विप संस्थेच्या संचालकाशी लागेबांधे असल्याबाबतचा पुरावा मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला एकटयालाच या प्रकरणात जबाबदार धरले गेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाशी संबंधीत असणा—या मार्केटींग विभागातील दोन आणि अकौंट विभागातील दोन कर्मचा—यांना कामावरून कमी केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर अफराफरची व्याप्ती सुमारे एक कोटी पर्यंत असल्यामुळे विप संघाने सर्व संबंधीताविरूध्द योग्य ती कारवाई केली आहे. विप संघाने माझेसह ४ कर्मचा—यांविरूध्द अंतर्गत लेखा परिक्षक यांच्या अहवालानुसारच कारवाई केली आहे याबाबत मला माहित नाही. विप संघाच्या अंतर्गत लेखा परिक्षण अहवालामध्ये खाडाखोड होवूनही ती बीले पुढे मंजूरी व तपासणीसाठी अनुक्रमे प्रविण देसाई, निलेश भोसले आणि सचिन पाटील यांच्या निष्काळजीपणामुळे मंजूर झाली आहेत असा अहवाल दिला आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रू. ३६,००,०००/— कशी वसूल झाली याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, विप संस्थेकडे वाहतूक संस्थेची अनामत रक्कम आणि प्रलंबीत बीले असल्यामुळे रक्कम रू. ३६,००,०००/— वसूल होवू शकले अन्यथा

विप संस्थेस मोठे आर्थिक नुकसान झाले असते. हे म्हणणे खरे नाही की, माझे गंभीर निष्काळजीपणामुळे मोठा आर्थिक घोटाळा झाला. सदरच्या आर्थिक घोटाळयामुळे विप संघाची प्रतिष्ठा आणि नावलौकीकेस बाधा पोहोचली याबाबत मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विप संघाने माझेविरूध्द केलेली कारवाई कायदेशीर आणि योग्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रार आणि शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

**सही/—**

कोल्हापूर.

दिनांक:—०६/०३/२०२६

( के. बी. कामगौडा )

न्यायाधीश,

कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.